महावितरण

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
कामगार औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

जा.क्र. : काऔसंवि/अ/ २६५८८

दिनांक : २३/०८/२०१०.

# परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या किमान वेतनाबाबत.

संदर्भ : १) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/३३१७ दि.१/२/२०१०.
२) सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. काऔसंवि/अ/५५८० दि.२२/२/२०१०.

**********

उपरोक्त संदर्भ क्र.२च्या परिपत्रकाद्वारे परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि.०१/०१/२०१० ते ३०/०६/२०१० या कालावधीकरिताचे दिलेले होते.

कामगार उपायुक्त (ग्रा.वि. ) व सक्षम प्राधिकारी. किमान वेतन अधिनियम १९४८, मुंबई यांनी अधिसूचना क्र. ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१०-२ कार्या-१० दि. ०६/०८/२०१० च्या आदेशान्वये दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगांसह इतर उद्योगातील कामगारांकरिता प्रतिमहिना **परिमंडळनिहाय विशेष भत्त्याचे दर दि. १ जुलै, २०१० ते दि. ३१ डिसेंबर, २०१० या कालावधीकरिता रु. १३९४.०० जाहीर केलेले आहे.**

| अ.क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | *परिमंडळ - १ | *परिमंडळ - २ | *परिमंडळ - ३ |
|---|---|---|---|---|
| १. | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | १३९४.०० | १३९४.०० | १३९४.०० |

* स्पष्टीकरण - महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ
(अ) परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्रांचे मिळून होईल.
(ब) परिमंडळ २ - महाराष्ट्र राजयातील अ व ब वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्रांचे मिळून होईल.
(क) परिमंडळ ३ - परिमंडळ १ व २ वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्रांचे मिळून होईल.

महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत विविध उद्योगातील रोजंदारी कामगाराकरिता जाहीर केलेले विशेष भत्त्याचे दर महावितरण कंपनीत कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या रोजंदारी कामगारांना लागू आहेत. तरी सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी किमान वेतन व विशेष भत्त्याच्या सुधारित दराबाबतची अंमलबजावणी करावी.

किशोर पवार
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे विभागीय कार्यालय स्तरापर्यंत.

E:\Backup Of Meena\D Drive\kantrti kam\kiman vetan.doc